स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

• बीड • बुधवार, दिनांक २० मे २०२६ • वर्ष २१ वे • पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com • किंमत ३ रुपये

# बीड येथील जामे मस्जिद किल्लाची गट नंबर 45 मधील 32 एकर जमीन शेख निजाम यांच्या नावे कोणी व कशी केली?

14/11/2008 च्या सातबारामध्ये जामे मस्जिद किल्लाचे नाव असून दि. 12/11/2025 मध्ये शेख निजाम यांचे नाव लावले कोणी आणि कसे?


हायकोर्टचा आदेश तसेच वक्फ मंडळाच्या वेळोवेळी सूचनांचे पत्र असताना याप्रकरणी वाद चिघळून मुडदे पडल्यानंतर तहसील प्रशासन यावर निर्णय घेणार का?


ज्या तीन तरुणांनी हा लढा सुरू केला, तो वैयक्तिक कारणांसाठी नव्हे तर बालेपीर भागातील मुस्लिम समाजाला कब्रस्तानच शिल्लक राहिले नाही म्हणून हा संघर्ष!!

## बालेपीर भागातील तमाम मुस्लिम समाजाचा प्रशासनाला रोकडा सवाल

**बीड : प्रतिनिधी**

मागील पाच वर्षांपासून दिवसेंदिवस बीड शहरातील बालेपीर भागातील मुस्लिम समाजाला कब्रस्तानसाठी जागाच शिल्लक नसल्यामुळे अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे या भागातील जामे मस्जिद किल्ला या दर्गाची गट नंबर 45 मधील 32 एकर जमीन हक्काची असताना ती जमीन सध्या तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार शेख निजाम यांच्या नावे आहे आणि ती चुकीच्या पद्धतीने लावण्यात आली आहे. याबाबतचे सबळ पुरावे हायकोर्ट, वक्फ बोर्ड आणि तहसील प्रशासनाकडे दिलेले आहेत. मात्र तहसील प्रशासन यावर हेरींगच्या नावाखाली तारखांवर तारखा देण्यापलीकडे काहीच का करू शकत नाही? याचे आश्चर्य वाटते. तहसील प्रशासनाची भूमिका अत्यंत संशयास्पद असून हे प्रशासन समोरच्या पार्टीला पाठीशी घालत असल्याचे स्पष्ट जाणवत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या प्रकरणात तक्रारदारांनी जे पुरावे सादर केले आहेत त्यावर किंवा समोरच्या पार्टीकडे सबळ पुरावे असतील तर त्यावर तहसील प्रशासनाने तात्काळ निर्णय देणे गरजेचे आहे. अन्यथा सदरील प्रकरणाचा वाद चिघळला तर मुडदे पडतील, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल आणि याला सर्वस्वी तहसील प्रशासन जबाबदार असेल असे तक्रारदारांनी बोलून दाखविले आहे.





14-11-2008 ✓

20-3-2025 X

### तहसील प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे या प्रकरणात कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होणार!!

अशा प्रकरणांमध्ये संबंधित प्रशासनाने वेळीच लक्ष घातले नाही आणि दिरंगाई केली तर संबंधितांच्या सहनशीलतेचा अंत संपतो. शेवटी वाद निर्माण होऊ लागतात आणि हा वाद टोकाला जाऊन मुद्दे पडण्याची शक्यता असते. याला नंतर सर्वस्वी संबंधित प्रशासन जबाबदार असते. अशा घटना अनेक ठिकाणी अनेक वेळा घडलेल्या आहेत, त्याची पुनरावृत्ती बीड येथील बालेपीर जामे मस्जिद किल्ला प्रकरणी होईल, अशी भीती व्यक्त होत असताना देखील बीड येथील तहसील प्रशासन मात्र याबाबत वेळ काढूपणा करीत आहे, असे मागील तीन वर्षांपासून दिसून येत आहे. सदरील प्रकरण पेटले आहे, त्याचा भडका कधी व केव्हा होईल हे सांगता येणार नाही. जर यदाकदाचित मुस्लिम समाजाचे टाळके फिरले आणि मोठा अनर्थ घडला, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याला सर्वस्वी तहसील प्रशासन जबाबदार असेल अशाही भावना काही मुस्लिम बांधवांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना व्यक्त केल्या आहेत.

### तहसील कार्यालयाची जागा दैनिक 'वास्तव'ला विकत घ्यायची, त्याचा 7/12 कधी देरणार ते सांगा?

● बीड शहरातील बालेपीर जामे मस्जिद किल्ला या दर्गाची गट नंबर 45 मधील हक्काच्या 32 एकर जमीनवर रात्रीतून दुसऱ्याचे नाव लागल्याने सदरील प्रकरण जोरदार चर्चेत असतानाच आता बीड तहसील कार्यालयाची जागा विकत घ्यायची असून त्या जागेचा सातबारा किती दिवसात दैनिक 'वास्तव'च्या नावावर करून मिळणार? असा सवाल दैनिक 'वास्तव'ने केला आहे. ही मागणी किंवा हा सवाल भलेही अवास्तव वाटत असला तरीही बीड तहसील कार्यालयाची सद्यपरिस्थिती काहीशी अशीच असल्याचे दिसून येत आहे. मागील तीन वर्षांपासून बालेपीर जामे मस्जिद किल्ला या दर्गाच्या जमिनीचे प्रकरण देखील असेच आहे, असे अनेकांचे म्हणणे आहे. या या भागातील मुस्लिम बांधवांच्या म्हणण्यामध्ये जवळपास सगळेच तथ्य असल्याचेही याबाबतचे कागदपत्र पाहता दिसून येते. रात्रीतून जर एखाद्याच्या हक्काच्या जागेवर दुसऱ्याने अतिक्रमण करून त्याच्या नावे सातबारा होत असेल तर बीड तहसील कार्यालयाची जागा दैनिक वास्तवाच्या नावावर व्हायला काय हरकत आहे? याचे उत्तर बीड तहसील प्रशासनाने नक्कीच द्यायला हवं, अशी दैनिक 'वास्तव'ची मागणी आहे.

### तहसीलदार साहेब! बालेपीर जामे मस्जिद किल्ला प्रकरणात जो निर्णय द्यायचा तो लगेचच द्या!!

बीड तहसीलदार साहेबांनी बालेपीर जामे मस्जिद किल्ला प्रकरणात जो निर्णय द्यायचा आहे तो देण्यासाठी आणखी किती विलंब करणार? जर बालेपीर जामे मस्जिद किल्ला गट नंबर 45 मधील 32 एकर जमीन शेख निजाम यांच्या नावे असेल तर त्यांच्या बाजूने निर्णय द्यायला का उशीर करीत आहात? आणि जर शेख निजाम यांची ही जमीन नसेल तर बालेपीर जामे मस्जिद किल्ला या नावाची दुरुस्त केलेली सातबारा त्यांना तात्काळ का मिळत नाही? तहसीलदार साहेब, तुम्ही जेवढे हे प्रकरण दप्तर दिरंगाईमध्ये ठेवणार तितक्या लवकर हा वाद चिघळणार असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, यात तिळमात्र शंका नाही. एकूणच सदरील प्रकारणामध्ये तहसीलदार साहेबांनी जो योग्य वाटेल तो निर्णय त्यांनी द्यायचा आहे आणि तोही लगेचच द्यायचा आहे, अशा संतप्त भावना मुस्लिम समाजामधून व्यक्त केल्या जात आहेत.

# १.७७ लाख शेतकरी कुटुंबांच्या प्रलंबित विम्यासाठी खासदार-आमदार कार्यालयांसमोर आंदोलन

➤ २०२५ च्या अतिवृष्टी नुकसानभरपाई व विमा रकमेच्या मागणीसाठी १ व ८ जूनला निवेदन ➤ शासनाने तातडीने निर्णय घ्यावा – भाई थावरे

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

२०२५ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेली विमा व नुकसानभरपाईची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने बीड जिल्ह्यातील तब्बल १ लाख ७७ हजार ३५१ शेतकरी कुटुंबांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला असून, १ जून २०२६ रोजी बीड लोकसभेचे खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या कार्यालयासमोर तर ८ जून २०२६ रोजी माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या कार्यालयासमोर निवेदन देऊन आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिली.

जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०२५ मध्ये महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. जिल्ह्यातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने विशेष बाब म्हणून प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, घोषणेला



बराच कालावधी उलटूनही अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात शेतकरी संघटनांकडून यापूर्वीही प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. २ एप्रिल २०२६ रोजी प्रशासनाला स्मरणपत्र देण्यात आले होते, तर १ मे रोजी विविध ग्रामपंचायतींमार्फत जनजागृती अभियान राबवून निवेदने सादर करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने लोकप्रतिनिधींकडे थेट दाद मागण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यावेळी भाई गंगाभिषण थावरे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील शेतकरी दुष्काळ आणि अतिवृष्टी अशा दोन्ही नैसर्गिक संकटांचा सातत्याने सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने जाहीर केलेली मदत वेळेत मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रलंबित विमा व नुकसानभरपाईची रक्कम तातडीने वितरित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, प्रस्तावित आंदोलनात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने विमा लाभधारक शेतकरी सहभागी होणार असून, प्रलंबित विमा व नुकसानभरपाईच्या मागण्या लोकप्रतिनिधींसमोर मांडण्यात येणार असल्याचे शेतकरी संघटनांनी स्पष्ट केले आहे.




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# लोककलेचा जागतिक आवाज ठरलेले डॉ. गणेश चंदनशिवे यांची मुंबई विद्यापीठात प्रोफेसरपदी पदोन्नती

**मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांची मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागात प्रोफेसर पदावर पदोन्नती झाल्याने वसईसह मराठवाडा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. टेंभुर्णी (ता. जाफराबाद, जि. जालना) येथील सुपुत्र असलेले डॉ.गणेश चंदनशिवे गेल्या वीस वर्षांपासून मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीत कार्यरत असून लोककला, लोकसाहित्य आणि तमाशा परंपरेच्या अभ्यासाला त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे विचारपीठ मिळवून दिले आहे.**



विशेष

प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे
नाट्यशास्त्र विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी,
जि. जालना संवाद :9823836675

नुकत्याच पार पडलेल्या मुंबई विद्यापीठाच्या वरिष्ठ निवड समितीच्या बैठकीत डॉ. गणेश चंदनशिवे यांची प्रोफेसर पदावर एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या या यशामुळे वसईकरांच्यासह मराठवाड्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. गणेश चंदनशिवे यांचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण टेंभुर्णी येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून नाट्यकलेचे शिक्षण घेतले. तमाशा लोककला या विषयावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून पीएच. डी. संपादन केली. लोककला हा त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय असून तमाशा आणि लोकपरंपरा या विषयांवरील त्यांचे संशोधन विशेष मानले जाते.

लोककलेच्या जतन आणि संवर्धनासाठी त्यांनी सातत्याने संशोधनपर कार्य केले असून विविध अभ्यास मंडळांवर सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. भारतातील विविध विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना लोककलेचा अभ्यास कसा करावा याबाबत ते मार्गदर्शन व प्रशिक्षण देत असतात. परदेशात भारतीय लोककलेचे महत्त्व पोहोचविण्यातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. लोकसाहित्य आणि लोककला क्षेत्रात त्यांची मोठी ग्रंथसंपदा असून विविध साहित्य संमेलनांमध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणून भूमिका बजावली आहे. विविध वृत्तवाहिन्यांवरील त्यांच्या मुलाखती विशेष चर्चेत राहिल्या असून एबीपी माझाच्या "माझा कट्टा" या कार्यक्रमातील त्यांची मुलाखतही विशेष गाजली होती. अनेक हिंदी व मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी पार्श्वगायन करून कलाक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. गणेश चंदनशिवे म्हणाले, "वसई ही माझी जन्मभूमी नसली तरी ती माझी कर्मभूमी आहे. वसईचे ऋण मी कधीही विसरणार नाही. याच भूमीने मला उभारी दिली आणि प्रगतीचा मार्ग दाखविला."लोककलेचा खरा वारसा जपत वसई आणि पालघर परिसराचे नाव देश–विदेशात पोहोचविणाऱ्या डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या प्रोफेसर पदावरील पदोन्नतीमुळे लोककलेचाही एका अर्थाने गौरव झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यमान महापौर अजीव पाटील, माजी आमदार हितेंद्र ठाकूर, साहित्यजल्लोष प्रतिष्ठानचे संदेश भाऊ जाधव, डिंपल प्रकाशनचे अशोक मुळे यांचेसह अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ. बळीराम पांडे : प्रबोधनाचा प्रेरणास्त्रोत

**मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण देशभर आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या देवगिरी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात कार्यरत असलेले आमचे जिवलग सन्मित्र, संघर्ष योद्धा, विचारवंत, साहित्यिक तथा प्रबोधनाचा प्रेरणास्त्रोत प्रा. डॉ. बळीराम पांडे यांचा २० मे हा जन्मदिन. या निमित्ताने त्यांच्या संघर्षमय, प्रेरणादायी आणि समाजाभिमुख जीवनप्रवासाकडे पाहताना मन अभिमानाने भरून येते.**



विशेष

प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे
नाट्यशास्त्र विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी,
जि. जालना संवाद :9823836675

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. संकटे, अभाव, संघर्ष आणि जीवनातील असंख्य वादळांना सामोरे जात त्यांनी स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडविले. सामान्य परिस्थितीतून असामान्य उंची गाठणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये डॉ. बळीराम पांडे यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. आज ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, जीवाला जीव देणारे मित्र, एकनिष्ठ कार्यकर्ते, अभ्यासू विचारवंत आणि कुशल संघटक म्हणून सर्वपरिचित आहेत.

मराठवाड्यातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. परिवर्तनवादी विचारांचा ध्यास घेत त्यांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाची मशाल प्रज्वलित ठेवली आहे. त्यांच्या पायाला जणू भिंगरीच लागलेली आहे; कारण विश्रांतीपेक्षा समाजकार्य त्यांना अधिक प्रिय आहे. त्यामुळे त्यांच्या आयुष्याची गाथा शब्दबद्ध करणे हे खरोखरच कठीण कार्य आहे. मात्र असे प्रेरणादायी आयुष्य इतिहासाच्या पानांवर नोंदले गेलेच पाहिजे, असे मनापासून वाटते.

डॉ. पांडे यांचे जीवन म्हणजे संघर्षातून उभ्या राहिलेल्या एका नायकाची प्रेरणादायी कहाणी होय. अनेक संकटे, अडथळे, अवहेलना आणि कठीण प्रसंग आले, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. चिकाटी, जिद्द आणि ध्येयवादी वृत्तीच्या बळावर ते आजही तितक्याच ताकदीने समाजकार्यात उभे आहेत. त्यांच्या जगण्याचा समग्र पट हा एका संघर्षशील योद्ध्याचा जीवनप्रवास अधोरेखित करतो.

शिक्षणक्षेत्र त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळ आहे. बालपणीचा "बळी" नावाचा एक सामान्य मुलगा ते प्रा. डॉ. बळीराम पांडे होईपर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ वैयक्तिक यशाचा नाही, तर ज्ञानाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याच्या ध्येयाचा प्रवास आहे. ज्ञान हेच समाजाच्या मुक्तीचे प्रभावी साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. शिक्षण हा न्यायी, समताधिष्ठित आणि प्रबुद्ध समाजाचा पाया आहे, ही त्यांची विचारधारा त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रकर्षाने दिसून येते.

बुद्ध, शिवराय, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे ते प्रखर अभ्यासक आणि वाहक आहेत. ही परिवर्तनवादी विचारधारा जनमानसात पोहोचावी, समाजात समता, बंधुता आणि मानवता रुजावी यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. समाजातील उपेक्षित, वंचित आणि तळागाळातील माणसांच्या प्रश्नांसाठी त्यांनी अनेक लढे उभे केले. संघर्ष या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणजेच प्रा. डॉ. बळीराम पांडे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सुमारे चार दशकांच्या संघर्षशील प्रवासात त्यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक लढ्यांचे नेतृत्व केले. तळागाळातील माणसांसाठी संघर्ष करताना त्यांनी स्वत:च्या आयुष्याची पर्वा केली नाही. त्यांच्या या संघर्षाचे आम्ही प्रत्यक्ष साक्षीदार आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आम्ही एकत्र घडलो, वाढलो आणि विचारांच्या वाटेवर चालत राहिलो. अस्तित्वाची लढाई, सत्त्वपरीक्षा आणि अनेक संघर्षमय प्रसंगांमधून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक प्रगल्भ होत गेले.

आदरणीय सतीश भाऊ चव्हाण यांच्याशी असलेले त्यांचे ऋणानुबंध हे त्यांच्या आयुष्यातील एक सोनेरी पर्व म्हणावे लागेल. त्या नात्यातील अनेक नाजूक, भावनिक आणि प्रेरणादायी धागे त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने जपले आहेत. माणुसकी, मैत्री आणि निष्ठा या मूल्यांचे ते जणू चालते–बोलते विद्यापीठ आहेत.

डॉ. बळीराम पांडे यांची संघर्षयात्रा ही केवळ एका व्यक्तीची कहाणी नाही, तर ती अनेकांना प्रेरणा देणारी, संस्कार करणारी आणि समृद्ध करणारी जीवनगाथा आहे. त्यांचा जीवनप्रवास तरुण पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यांनी केलेले कार्य, जपलेली मूल्ये आणि जोपासलेली विचारधारा ही समाजासाठी प्रेरणेची अखंड ऊर्जा आहे.

२० मे या त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना उदंड आयुष्य, उत्तम स्वास्थ्य आणि अखंड कार्यशक्ती लाभो, हीच सदिच्छा! त्यांच्या लेखणीला, विचारांना आणि समाजप्रबोधनाच्या कार्याला अधिकाधिक बळ लाभो, हीच मन:पूर्वक प्रार्थना.

जन्मोत्सवाच्या आभाळभर शुभेच्छा..!

# ७० कॅमेऱ्यांच्या नजरकैदेलाही चोरट्यांचे खुले आव्हान; कन्नड शहरात एकाच रात्रित चार घरफोड्या




### महत्वाचे ठळक मुद्दे

● एकाच रात्री चार घरफोड्या – १८ ते १९ च्या रात्री अज्ञात चोरट्यांचा धुमाकूळ ● पोलीस कर्मचाऱ्याचेही घर सुरक्षित नाही हेड कॉन्स्टेबल दिनेश खेडकर यांच्या घरावरही हात ● सुमारे १७ लाखांचा ऐवज लंपास – सोने, चांदी व रोख रक्कम चोरी ● चित्रपट स्टाईल चोरी – शेजाऱ्यांच्या घराला बाहेरून कडी लावून चोरांनी डाव साधला ● चोर पायीच आला – सीसीटीव्हीत वाहनाचा मागमूस नाही, चेहरा झाकलेला ● ७० कॅमेऱ्यांना थेट आव्हान – नुकत्याच बसवलेल्या हायटेक कॅमेऱ्यांची प्रभावीता प्रश्नचिन्हात ● नागरिकांत संताप – घटनास्थळी वरिष्ठ अधिकारी न आल्याने नाराजी ● पोलीस तपास सुरू – सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोधमोहीम

● कन्नड / प्रतिनिधी :

कन्नड शहरात सोमवारी दि. १८ ते १९ मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी सत्र राबवत एकाच रात्री चार घरे फोडली. विशेष म्हणजे, कन्नड शहर पोलीस ठाण्यात कार्यरत हेड कॉन्स्टेबल दिनेश खेडकर यांच्या घरालाही चोरट्यांनी लक्ष्य केले, त्यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

द्वारकानगरी येथील आबासाहेब बारगळ यांच्या घरातून सुमारे १२ लाखांचा ऐवज, तर समर्थनगर येथील रोहित चव्हाण यांच्या घरातून सुमारे ५ लाखांचा मुद्देमाल चोरीस गेला. याशिवाय खेडकर व महिरे यांच्या घरातूनही रोख रक्कम लंपास करण्यात आली. विशेष म्हणजे, चोरट्याने कोणतेही वाहन न वापरता पायी येऊन चेहरा झाकून ही चोरी केल्याचे सीसीटीव्ही तपासात समोर आले आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच शहरात सुरक्षेसाठी ७० हायटेक कॅमेरे बसवण्यात आले होते.

मात्र, या कॅमेऱ्यांनाच चोरट्यांनी उघडपणे आव्हान दिल्याने शहराच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस प्रशासन आता कोणती ठोस पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कधीपासून लागू होणार 8वा वेतन आयोग ? मोठी अपडेट आली समोर

नवी दिल्ली : केंद्र सरकारने यावर्षाच्या सुरुवातीला 8 व्या वेतन आयोगाची स्थापन केली आहे. पण अजून लागू करण्याची घोषणा केलेली नाही. नॅशनल मिशन फॉर ओल्ड पेन्शन स्कीम, भारतचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मनजीत सिंह पटेल यांनी याविषयावर मोठी अपडेट दिली आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांमध्ये 8 वा वेतन आयोगाची मोठी चर्चा आहे. केंद्र सरकारने या वर्षाच्या सुरुवातीलाच जानेवारीमध्ये 8व्या वेतन आयोगाची स्थापना केली आहे. पण अजून तो लागू केलेला नाही. सध्या आयोग प्रत्येक राज्यात जाऊन केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी चर्चा करत आहे. अर्थात हा नवीन वेतन आयोग कधीपासून लागू करण्यात येणार याविषयीची मोठी अपडेट समोर आली आहे. नॅशनल मिशन फॉर ओल्ड पेन्शन स्कीम, भारतचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मनजीत सिंह पटेल यांनी याविषयीची माहिती दिली आहे.

**केव्हा लागू होणार 8 वा वेतन आयोग?**

डॉ. मनजीत पटेल यांच्या माहितीनुसार 8 वा वेतन आयोगातंर्गत वाढलेला पगार, थकबाकी आणि निवृत्तवेतन लवकरच कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यानुसार, एप्रिल 2027 मध्ये ही वेतन, थकबाकी आणि निवृत्ती रक्कम केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. डॉ. मनजीत पटेल यांनी याविषयीचे गणित समजावून सांगितले आहे.

केंद्र सरकारने ऑक्टोबर 2025 मध्ये 8 व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली. नोव्हेंबर 2025 मध्ये आयोगासाठी गॅझेटमध्ये अधिसूचना काढण्यात आली. आयोगाला अंतिम अहवाल सादर करण्यासाठी 18 महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. नोव्हेंबर 2025 पासून 18 महिन्यांचा कालावधी मोजल्यास एप्रिल – मे 2027 च्या जवळपास वेतन आयोग लागू होऊ शकतो. या कालावधीत कर्मचाऱ्यांना पैसे मिळतील.

**8 व्या वेतन आयोगाची नंतरची बैठक कुठे?**

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मागण्या काय आहेत. त्यांना वेतन आयोगाकडून काय काय हवे आहे याविषयची चर्चा करण्यात येत आहे. गेल्या महिन्यात दिल्लीत याविषयीची एक बैठक घेण्यात आली होती.

आज वेतन आयोगाचे सदस्य हैदराबाद येथे आहेत. तिथे त्यांची बैठक सुरू आहे. त्यानंतर आयोगाची पुढील बैठक 1–4 जूनपर्यंत श्रीनगर येथे होईल. त्यानंतर 8 जून रोजी आयोग लद्दाख येथे जाणार आहे.

# तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीत खाणावळीच्या नावाने सरास दारू विक्री ?

## कंदुरी मटण, ढवारा मटणासारखे नावे देऊन आत मिळते देशी विदेशी दारू ?

### हफ्ते खोरी मुळे असे धंदे जोरात ? कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी लक्ष घालण्याची मागणी

**गेवराई : प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा गाव व परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे बोकाळल्याचे सरास चित्र पहावयास मिळत असुन तलवाडा पोलिस स्टेशनच्या हाद्दित महापुरुषाच्या पुतळ्या पासुन अवघ्या हकेच्या अंतरावर विविध प्रकारचे अवैध धंदे जोरात चालु असल्याचे निदर्शनास येत आसतांना देखील संबंधित प्रशासना कडुन अर्थीक डोळेझाक तर होत नसावी आसा प्रश्न सर्वसामान्यातुन उपस्थित केला जात आहे . तसेच गेवराई ते तलवाडा रस्त्यावर खानावळी टाकून बिनधास्त दारू विक्री चालु असुन या कडे देखील संबंधित प्रशासना कडुन दुर्लक्ष होत असल्याने नागरिकातुन आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे . अस्या धंदेवाल्या कडुन महिन्याकाठी मोठ्या प्रमाणात हप्ता मिळत असल्याची जागो जागी चर्चेला उधाण आले आसल्याने कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अस्या बेकायदेशीर मार्गाने रोज लाखो रुपये कमवणा-यावर कार्यवाही करावी आशी मागणी जनतेकडून होऊ लागली आहे . बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी नव्याने रुजु झाल्या पासुन एखाद्या चित्रपटा सारखे कार्यवाही करून दोन नंबर वाल्यांत धडकी भरवली होती . पोलीस अधीक्षकांचा तो दरारा संपल्याची चर्चा स्वकिय प्रशासनातीलच काही कर्मचारी दबक्या आवाजात करतांना आडळुन येत आहेत . त्या मुळे अवैध धंदे चालकांचे मनोबल वाढल्याचे एंकदरित





चित्र दिसुन येत आहे . जिल्ह्यात सर्वसामान्य जनतेला पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मुळे सुरक्षित वाटू लागले होते . त्यात कुठे तरी जिल्ह्याचे वातावरण स्वच्छ होत असताना तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीत मात्र प्रशासनाच्या फायद्याचे दिवस पहावयास मिळत असून तलवाडा या ठिकाणी ढवारा मटण कदुरी मटण असे मोठ मोठे फलक लाऊन अस्या हॉटेल वर चक्क देशी विदेशी दारू रोज मोठ्या प्रमाणात विकली जात असून हा सर्व प्रकार खुले आम चालु असुन असे धंदे पोहीतांडा ते तलवाडा रोड वर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक एवढेच नाही तर सार्वजनिक बारव ते नविन बस स्थानक रोडवर चालू असुन अंबिकानगर, गणेश नगर, या ठिकाणी घरगुती चोरटी दारू चालू असून रोज बेकायदेशीर मार्गाने लाखो रुपयांची उलाढाल होताना दिसून येत असून दारुच्या अड्ड्यामुळे सुशिक्षित बेरोजगार युवक व्यसनाधीन होताना दिसून येत आहे तलवाडा चे बीट अंमलदार यांचे किती मोठे लक्ष आहे हे धंदे पाहुन सर्व सामन्यांना प्रश्न पडत आहे तर दुसरी कडे अस्या धंदे वाल्यांना सोन्याचे दिवस आले असुन तलवाडा पोलीस मात्र पोलीस ठाण्यात सामान्य जनांना हेकेखोरीची भाषा करतांना दिसुन येत आहे . एवढ्या मोठ्या प्रमाणात दारू विक्री होत आहे ते पण दिवसा ढवळ्या हफ्ते खोरी मुळे तलवाडा पोलीसा बद्दल नागरिकांतून चर्चा होताना दिसून येत आहे तरी जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तलवाड्यात एंखादी तरी सिंघम कार्यवाही करून सामान्य जनांना दिलासा द्यावा आशी मागणी होऊ लागली आहे .

---

**विशेष**



## नीट पेपर फुटीचा मास्टरमाईंट पी. व्ही. कुलकर्णीला मोठ झटका



बीड : नीट पेपर फुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार पी .व्ही . कुलकर्णीच्या बीड येथील शाहूनगरमधील अवैध बांधकामावर नगरपरिषदेने कठोर कारवाई सुरू केली आहे . तपासणीत कोणतीही परवानगी नसताना, नियमबाह्य बांधकाम केल्याचे उघड झाले . यामुळे सर्व संबंधित धारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, लवकरच तोडक कारवाई केली जाणार आहे . नगरपरिषदेने अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी कंबर कसली आहे .

प्रकरणामुळे देशभरात तर खळबळ उडालीच पण लाखो विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांच्या स्वप्नांचा चुराडा झाला . याप्रकरणाचा तपास सुरू असून सीबीआयच्या तपासात अनेक धागेदोर समोर येत आहेत . याच पेपर फुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार अर्थात मास्टरमाईंड पी .व्ही कुलकर्णी याला सीबीआयने पुण्यातून अटक केली होती . नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या अतिशय गोपनीय अशा प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीशी कुलकर्णी हा संबंधित होता, अशी माहिती समोर आली . त्याच्या अटकेने प्रचंड खळबळ माजली .

आता याच पी .व्ही . कुलकर्णीला आणखी एक मोठा धक्का बसला आहे . सध्या तुरूंगाच्या गजाआड असलेल्या पी .व्ही कुलकर्णी याचे बीड शहरातील शाहूनगर भागात इमारतीचे बांधकाम सुरू आहे . मात्र त्याचं बांधकाम विनापरवाना असल्याचं उघड झालं असून आता त्यावर तोडक कारवाई होणार आहे . नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे .

### विनापरवाना बांधकाम, कारवाई होणार

बीड शहरामध्ये शाहूनगर भागात एक अनधिकृत बांधकाम, विनापरवानगी बांधकाम सुरू आहे . आणि ते नीट पेपर फुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार पी .व्ही कुलकर्णी याचे इमारतीचे बांधकाम आहे . मात्र यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेच्या नगररचना कार्यालय आणि मालमत्ता कर विभागाने पाहणी केली तसेच चौकशीही करण्यात आली . तेव्हा त्या ठिकाणी गंभीर त्रुटी आणि अनियमितता आढळून आली आहे . त्या बांधकामाची परवानगीची संचिका आम्ही तपासली, मात्र कुलकर्णी याच्या बांधकामासाठी कुठल्याही प्रकारची परवानगी घेण्यात आलेली नाही . तसेच चारही बाजूने नियमानुसार सोडल्या जाणाऱ्या जागेतही बांधकाम करण्यात आलं आहे . यामुळे या बांधकामाशी संबंधित सर्व होल्डर्सना नोटीसा बजावून पुढील कारवाई केली जाणार आहे . तसेच तोडक कारवाई देखील केली जाणार आहे, अशी माहिती नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे यांनी दिली आहे .त्यामुळे कुलकर्णी याच्या अडचणी चांगल्याच वाढल्या असून ते बांधकाम लवकरच पाडलं जाणार असून त्याच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे .

### कोण आहे पी.व्ही. कुलकर्णी ?

2026 च्या नीट पेपरफुटीमध्ये महाराष्ट्र मॉड्यूलने अत्यंत महत्त्वाची आणि मोठी भूमिका बजावली . सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार पी . व्ही . कुलकर्णी हे अनेक वर्षांपासून नीटचे पेपर तयार करणाऱ्या ‘ एनटीए ’च्या राष्ट्रीय पॅनेलवर कार्यरत होते . त्यामुळे त्याच्याकडे वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र विषयांच्या प्रश्नपत्रिका पूर्णपणे उपलब्ध होत्या . पी .व्ही . कुलकर्णी पुण्यात विद्यार्थ्यांसाठी घरगुती शिकवणी वर्ग चालवायचा . या वर्गांमध्ये तो विद्यार्थ्यांना संभाव्य प्रश्न म्हणून प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्न वहीत लिहून घ्यायला सांगायचे . या रॅकेटमध्ये पी . व्ही . कुलकर्णी याने मनीषा वाघमारे हिच्याशी हातमिळवणी केली होती अशी माहिती समोर आली . कुलकर्णी हा सध्या सीबीआय कोठडीत आहे .

---

## ‘असो चैतको मयना’ हा हृदयस्पर्शी कविता संग्रह !

### कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर

**नाशिक : प्रतिनिधी**

“कलाली ( कलारी ) बोलीतील पहिलाच काव्य संग्रह ठरलेला प्राचार्य डॉ . रामदास चवरे यांचा ‘ असो चैतको मयना ’ हा कविता संग्रह रसिक मनाला साद घालणारा आहे . शब्दांचे हृदयस्पर्शी नाद आणि जीवनाची विविध रूपे येथे साक्षात होत जातात, असे गौरवोद्‌गार मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ . अविनाश आवलगावकर यांनी या कविता संग्रहाचे प्रकाशन करताना काढले .







डॉ . आवलगावकर पुढे म्हणाले की, मराठीतील विविध बोलींपैकी समजल्या जाणाऱ्या कलाली बोली बोलणाऱ्यांची महाराष्ट्र व इतर राज्यातही बरीच संख्या आहे . मराठीतील प्रसिद्ध लेखक, कवी, गीतकार, समीक्षक, संशोधक असलेल्या प्राचार्य डॉ . रामदास चवरे यांच्या 75 कवितांचा प्रस्तुत कविता संग्रह कलाल समूहाचे दु :ख, दैन्य, वेदना, विविध न्यास यांचा तलस्पर्शी आविष्कार ठरावा . ” महाराष्ट्र शासन व मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे नुकत्याच संपन्न झालेल्या बोली अभ्यासक कार्यशाळेत या कविता संग्रहाचे प्रकाशन समारंभात ते बोलत होते . यावेळी व्यासपीठावर गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ . प्रशांत बोकारे ( कुलगुरू, भाषा संचालक अरुण गिते, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक मराठी भाषा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ . सुबोध भांडारकर हे उपस्थित होते .

---

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सख्या दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू

### रेणापुरी गावावर शोककळा; पाथरी-ढालेगाव फाटा परिसरातील भीषण अपघात


**माजलगाव : प्रतिनिधी**

पाथरी–ढालेगाव ( रामपुरी फाटा ) परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाने मोटारसायकलला दिलेल्या जोरदार धडकेत रेणापुरी येथील सख्या दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला . ही हृदयद्रावक घटना सोमवारी ( दि . १८ ) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली .

या दुर्घटनेमुळे रेणापुरी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे .



मयत रवींद्र शिवाजी घडसिंगे , २७ वर्ष




मयत, विशाल शिवाजी घडसिंगे , २४ वर्ष

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील पुनर्वसन भागातील रेणापुरी येथील रवींद्र शिवाजी घडसिंगे ( वय २७ ) व विशाल शिवाजी घडसिंगे ( वय २४ ) हे दोघे सख्खे भाऊ ( एमएच–४४ एबी–२६२६ ) क्रमांकाच्या मोटारसायकलवरून पाथरीहून माजलगावकडे येत होते . यावेळी ढालेगाव ( रामपुरी फाटा ) ते पाथरी दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली .धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की दोघेही गंभीर जखमी होऊन रस्त्यावर फेकले गेले . अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने पाथरी येथील ग्रामीण रुग्णालयात हलविले . मात्र, अपघातातील गंभीर दुखापतींमुळे दोघांचाही रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले . घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला . अपघातानंतर चालक वाहनासह फरार झाला असून संबंधित अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी पाथरी पोलीस तपास करत आहेत . या दुर्दैवी घटनेमुळे घडसिंगे कुटुंबावर दु :खाचा डोंगर कोसळला असून रेणापुरी गावात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे . एकाच कुटुंबातील दोन तरुण भावांचा अकाली मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमधून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे

सांज दैनिक बीड वास्तव
सायं . दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी . बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले . **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट , निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो . 9022952922

---

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष




# हर हर महादेव 'च्या जयघोषात चिंचवनमध्ये शिवपुराण कथा सुरू

➤ वडवणी / प्रतिनिधी :
वडवणी तालुक्यातील चिंचवन येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिवपुराण कथेला रविवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला . यावेळी सुप्रसिद्ध कथाकार ह .भ .प . विक्रमजी महाराज चिलगर यांचा हार घालून सत्कार करण्यात आला तसेच ग्रंथपूजन करून शिवपुराण कथेची विधिवत सुरुवात करण्यात आली .

या शिवपुराण कथेसाठी चिंचवनसह पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते . संपूर्ण परिसर ' हर हर महादेव ' च्या जयघोषाने भक्तिमय झाला होता .

यावेळी आयोजक ह .भ .प . अशोक महाराज कदम यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या परिसरात एवढा मोठा शिवपुराण महोत्सव प्रथमच होत असून त्यासोबत भव्य–दिव्य बाल सुसंस्कार शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे . या शिबिरामध्ये बाल कीर्तनकारांची कीर्तने होणार असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले .

कार्यक्रमास मंकावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक बालाजी कोदुळे सर, ह .भ .प . पुरुषोत्तम महाराज कोदुळे, प्रा . शिवाजीराव कोदुळे, पांडुरंग मात्रे, बाबू अण्णा कोदुळे, भरत महाराज दोडताले, वसुदेव आप्पा कोदुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते .

# शिष्यवृत्ती परीक्षेत रुद्रप्रतापसिंह तौरचे घवघवीत यश

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी पात्र; नवोदय व सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेतही यश

माजलगाव / प्रतिनिधी :

तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयाचा विद्यार्थी रुद्रप्रतापसिंह योगेश तौर याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता पाचवी ) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून तो शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे .

ग्रामीण भागात शिक्षण घेत असतानाही रुद्रप्रतापसिंहने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळवले आहे . यापूर्वी तो जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा तसेच सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा यांमध्येही पात्र ठरला असून त्याच्या या यशामुळे राजेगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे .

रुद्रप्रतापसिंहच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड, सचिव व माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, दयानंद तोष्णीवाल, विलासराव लांडगे, संतोष कोथाळकर, प्रभाकराव कचरे, डॉ . योगिता होके पाटील, अभय होके पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब कचरे, उपाध्यक्ष विजय साळवे, शिक्षणप्रेमी नागरिक डॉ . जनक चौरे, मुख्याध्यापक अशोक कचरे यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .

रुद्रप्रतापसिंहच्या या यशामुळे सरस्वती विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधिक दृढ झाली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याने प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे .

# आमदार संजना जाधव यांच्याविरोधातील आक्षेप फेटाळला; अंतिम मतदार यादीत नाव कायम

कन्नड / प्रतिनिधी

औरंगाबाद ( छत्रपती संभाजीनगर ) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसंदर्भात आमदार संजना जाधव यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला आक्षेप जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळला असून त्यांचे नाव अंतिम मतदार यादीत कायम ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत .

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था संतोष बिडवई यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले . बँकेच्या २०२६ ते २०३१ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू आहे . रिट्ठीमोहर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाने ८ एप्रिल २०२६ रोजीच्या बैठकीत ठराव मंजूर करून श्रीमती रंजना हर्षवर्धन जाधव ( आमदार संजना जाधव ) यांची प्रतिनिधी म्हणून निवड केली होती . हा ठराव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांच्या कार्यालयात सादर करण्यात आला होता . दरम्यान, या निर्णयाविरोधात सुरेश डोळस यांनी आक्षेप नोंदवला होता . मात्र सुनावणीदरम्यान त्यांनी संस्थेच्या ठरावाच्या वैधतेबाबत किंवा प्रक्रियेबाबत कोणताही ठोस मुद्दा मांडला नसल्याचे निदर्शनास आले . तसेच संबंधित बाब ही निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत येत नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले . यामुळे सर्व बाबींचा विचार करून रिट्ठीमोहर्डा संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून आमदार संजना जाधव यांचे नाव अंतिम मतदार यादीत कायम ठेवण्याचा निर्णय देण्यात आला आहे .

# NEET पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा : एसएफआयचे वडवणीत आंदोलन

## NTA बरखास्त करा, शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा : एसएफआयचा एल्गार

### ➤ वडवणी तहसील कार्यालयावर विद्यार्थ्यांचा मोर्चा ➤ NEET पेपरफुटीविरोधात तीव्र घोषणाबाजी

➤ वडवणी / प्रतिनिधी :
वैद्यकीय प्रवेशासाठी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नाची केंद्र सरकारने क्रूर थट्टा केली आहे . नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील संशयास्पद बाबीमुळे देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोसळल्याचे स्पष्ट झाले असून हा केवळ घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे . शैक्षणिक संस्थांचे व्यापारीकरण करणाऱ्या धोरणामुळेच परीक्षांची निपक्षता धोक्यात आली आहे . नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ( NTA ) परीक्षेच्या गोपनीयतेचा अक्षरशा खेळ मांडला असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे ही संस्था विश्वासहर्ता पूर्णत : गमावून बसली आहे . या संस्थेवर बंदी घालण्याची मागणी अनेक वेळा झाली मात्र याची दखल न घेतल्यामुळे या वर्षी पुन्हा हा प्रकार झाला आहे . या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर SFI वडवणी च्या वतीने केंद्र सरकारच्या धोरणांचा व नाकर्तेपणाचा तीव्र निषेध करण्यात आला .वडवणी तहसील कार्यालयावर एसएफआयच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी तीव्र निदर्शने आंदोलन करून आपला रोष व्यक्त केला यावेळी विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या धोरणाच्या विरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थी, पालकांना व समाजातील लोकांना यावरोधात रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले . यावेळी विद्यार्थ्यांमध्ये आक्रोश दिसत होता . यावेळी एसएफआयच्या वतीने मुख्यमंत्र्यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन पाठवण्यात आले या निवेदनामध्ये १ ) घोटाळ्याची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या मार्फत चौकशी करण्यात यावी . २ ) पेपर फुटीच्या सूत्रधारांना कडक शिक्षा करण्यात यावी . ३ ) ज्या परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार झाले त्या केंद्राची मान्यता त्वरित रद्द करावी ४ ) केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा या व अन्य मागण्या एसएफआय वडवणी तालुका कमिटीच्या वतीने करण्यात आल्या . या आंदोलनात एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, जिल्हाध्यक्ष सत्यजित मस्के, बीडचे माजी सहसचिव




अभिषेक शिंदे यांनी आंदोलनाला संबोधित करत केंद्र सरकार वर ताशेरे ओढले . यावेळी ज्योतीराम कलेढोण, नैतिक साबळे, पठाण सलमान, प्रतिक साळवे, शेख रिजवान, अमन कुरेशी, पी . शंतनु, कृष्णा हेंद्रे, पृथ्वीराज मुंडे, कार्तिक तोंडे, अजय आडे, सोहम फुटाणे, प्रथमेश, बोंदार्डे यांच्यासह विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते .


# प्रशासनाच्या नियोजनाअभावी बळी? पुरुषोत्तमपुरीत गंगेत १३ वर्षीय आकाशचा दुर्दैवी मृत्यू

## यात्रेदरम्यान चिवडा-पेढे विक्री करून कुटुंबाला देत होता हातभार; घटनेनंतर सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

➤ माजलगाव : प्रतिनिधी
अधिकमास यात्रेनिमित्त भाविकांनी गजबजलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे मंगळवारी दि . १९ सकाळी हृदयद्रावक घटना घडली . गंगेत आंघोळ करण्यासाठी गेलेल्या आकाश लक्ष्मण म्हेत्रे वय १३, रा . पाटील गल्ली, माजलगाव या अल्पवयीन मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला . या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून भाविकांसह स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे . त्याचबरोबर यात्रास्थळी असलेल्या सुरक्षाव्यवस्थेबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत .

मिळालेल्या माहितीनुसार, आकाश हा आपल्या कुटुंबासह अधिकमास यात्रेनिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे आला होता . यात्रेच्या काळात तो चिवडा व पेढे विक्री करून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लावत होता . मंगळवारी सकाळी तो गंगेत स्नानासाठी गेला असता पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने नदीच्या खोल भागात गेला आणि बुडाला .

घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली . स्थानिक नागरिक, भाविक आणि उपस्थित तरुणांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली . बराच वेळ प्रयत्न केल्यानंतर आकाशला पाण्याबाहेर



काढण्यात आले . मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते .

घटनेची माहिती मिळताच पोलीस व संबंधित प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले . पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या .

दरम्यान, अधिकमास यात्रेनिमित्त लाखो भाविक पुरुषोत्तमपुरी येथे दाखल होत असल्याने नदीकाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे . अशा परिस्थितीत नदीपात्र परिसरात पुरेशा सुरक्षाव्यवस्थेचा अभाव असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे . विशेषत : धोकादायक ठिकाणी सूचना फलक, संरक्षक दोर, प्रशिक्षित बचाव पथक व लहान मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था यांसारख्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची मागणी होत आहे . आकाशच्या अकाली निधनामुळे त्याच्या कुटुंबावर दु :खाचा डोंगर कोसळला असून माजलगाव व पुरुषोत्तमपुरी परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे . या घटनेच्या पार्श्वभूमीवर यात्रास्थळी सुरक्षेच्या उपाययोजनांचा पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त केली जात आहे

# खळवट निमगाव येथे लाभार्थी संतृप्ती शिबिराचे उदघाटन

## "सर्वात दूर, सर्वात पहिले" देशव्यापी जनभागीदारी अभियानाचा आदिवासी समाजाने लाभ घ्यावा - होळंबे, वनवे








➤ वडवणी/विशेष प्रतिनिधी :
देशाचा मुळ मालक असणारा आदिवासी समाज आजही विकासापासून कोसो मैल दूर आहे . इतर समाजाबरोबर आदिवासी समाजही विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी शासन स्तरावर वेगवेगळी शिबिरे, विविध प्रकारच्या विकास योजना आदिवासी समाजासाठी राबवल्या जातात .देशातील आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरता "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान" या योजनेस केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, दिनांक २ ऑक्टोंबर २०२४ पासून सदर योजनेस माननीय पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते सुरू करण्यात आले आहे या अनुषंगानेच जन भागीदारी अभियान "सबसे दूर, सबसे पहले" ही मोहीम दिनांक १८ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीमध्ये "लाभार्थी संतृप्ती शिबिरे" आयोजित करून याद्वारे आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याचे मुख्य उद्दिष्टे या अभियानाचे आहे . या मोहिमेअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रसारित करून त्यावर लक्ष केंद्रित करत राज्य तथा, जिल्हास्तरीय शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यात येऊन गाव स्तरावर, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवून लाभांविषयी माहिती अधिक–अधिक आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सर्वांगीण विकास घडण्यास भर पडणार आहे .दिनांक 18 मे ते २५ मे २०२६ या कालावधीत "लाभार्थी संतृप्ती शिबिर बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात खळवट लिमगाव व कुप्पा या ठिकाणी माननीय जिल्हाधिकारी बीड व माननीय प्रकल्प अधिकारी ए .आ .वि .विभाग, प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमानाने संपन्न होत आहे .या शिबिरामध्ये ठक्कर बाप्पा, शबरी माता घरकुलची माहिती, शिक्षण– आरोग्य सुविधा, आर्थिक सशक्तीकरणासाठी रोजगार व स्वयंरोजगार, कृषी योजना, आधार कार्ड, राशन कार्ड, जन्मदाखला अशी विविध सरकारी कागदपत्रे अशा सर्वच आदिवासी समाजाच्या समस्यावर या शिबिरामध्ये उपाय शोधून त्याच ठिकाणी लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला जाणार आहे .या शिबिरामध्ये आदिवासी समाजातील पात्र असणारा लाभार्थी संतृप्ती होऊन जाणार आहे .त्यामुळे आदिवासी समाजातील प्रत्येक घटकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आव्हान एकात्मिक आदिवासी विकास विभाग छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम तसेच या विभागातील शिबिरार्थी अधिकारी ज्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये पार पडत आहे असे, श्री .लक्ष्मण होळंबे व श्री .सखाराम वनवे यांनी आदिवासी समाजाला या शिबिराचा जास्तीत–जास्त सहभागी होऊन लाभ घ्यावा असे, आव्हान आदिवासी समाजाला केले आहे .हे शिबिर यशस्वी होण्यासाठी उपविभागीय अधिकारी माजलगाव, वडवणीचे तहसीलदार, ता . कृषी अधिकारी वडवणी, ता .आरोग्य अधिकारी वडवणी, गटविकास अधिकारी वडवणी, गटशिक्षणाधिकारी वडवणी, विस्तार अधिकारी पंचायत समिती वडवणी, मु .जि .प .शाळा खळवट निमगाव, कुप्पा संबंधित दोन्ही गावचे सरपंच, पो .पाटील, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, आरोग्य सेवक, अंगणवाडी सेविका सर्व विभागाच्या अधिकारी– कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून हे शिबिर यशस्वीपणे पार पडत आहे .

सन्मान ➤ मा.श्रीमती स्वाती चिटणीस व मा.श्री. दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार

# 'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे 'चे पुरस्कार जाहिर

## ➤ बीड चे शाहीर विलास सोनवणे यांना "सर्वोत्कृष्ट लोककलावंत" पुरस्कार जाहीर.

➤ बीड / प्रतिनिधी :
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती, मुंबईच्या वतीने प्रतिवर्षी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ १४ जून रोजी पुरस्कार वितरण सोहळा व कलावंत मेळावा आयोजित करण्यात येतो . त्यावेळी रंगकर्मींना त्यांच्या रंगभूमीवरील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येते . ह्यावर्षी ज्येष्ठ अभिनेत्री मा .श्रीमती स्वाती चिटणीस* आणि ज्येष्ठ अभिनेते मा .श्री . दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे .* सदर ' पुरस्कार वितरण समारंभ ' रविवार, दिनांक १४ जून २०२६ रोजी दुपारी ०४ .०० वाजता यशवंत नाटय मंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई ४०००१६ येथे संपन्न होणार आहे .

या सोहळ्यात व्यावसायिक नाट्य पुरस्कारासाठी सर्वोत्कृष्ट लेखक प्राजक्त देशमुख ( नाटक : करुणाष्टके ), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक अमेय दक्षिणदास ( नाटक : कुटुंब किर्रर्रतन ), सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार ऋतुजा बोठे ( नाटक : चिरंजीव परफेक्ट बिघडलाय ), सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनाकार किशोर इंगळे ( नाटक : कुटुंब किर्रर्रतन ), सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीतकार अजित परब ( नाटक : बोलविता धनी ), सर्वोत्कृष्ट रंगभूषाकार उल्लेश खंदारे ( नाटक : भूमिका ), सर्वोत्कृष्ट व्यावसायिक नाटक कुटुंब किर्रर्रतन ( संस्था : गौरी थिएटर्स ), सर्वोत्कृष्ट अभिनेता संकर्षण कऱ्हाडे ( नाटक : कुटुंब किर्रर्रतन ), सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता आनंद इंगळे ( नाटक : एकदा पाहावं करुन ), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता वैभव रंधवे ( नाटक : चिरंजीव परफेक्ट



बिघडलाय ), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पर्ण पेठे ( नाटक : करुणाष्टके ), सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री चेतना भट ( नाटक : भ्रमाचा भोपळा ), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री समिधा गुरु ( नाटक : भूमिका ), नाट्य परिषद युवा नाट्य पुरस्कार अमेय धोपटकर, अभिनयासाठी विशेष लक्षवेधी पुरस्कार समृद्धी कुलकर्णी ( नाटक : चिरंजीव परफेक्ट बिघडलाय ) यांना प्रदान करण्यात येणार आहेत .

### प्रायोगिक नाट्य

पुरस्कारासाठी सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संगीत नाटक संगीत पद्माराणी ( संस्था : भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे ), सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक कर्ण ( संस्था : नटराज नाट्य कलामंडळ, बारामती ), सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक दिग्दर्शक आशुतोष वाघमारे ( नाटक : दगडी भिंत ), सर्वोत्कृष्ट पुरूष कलाकार इरफान मुजावर ( नाटक : युटोपिया ), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री आश्विनी आंचवले ( नाटक : अय ), प्रायोगिक संगीत नाटक सर्वोत्कृष्ट गायक अभिनेता अभिषेक काळे ( नाटक : संगीत कट्यार काळजात घुसली ), प्रायोगिक संगीत नाटकातील सर्वोत्कृष्ट गायक अभिनेत्री अनुष्का आपटे ( नाटक : संगीत शाकुंतल ), सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाट्य लेखक दत्ता पाटील ( नाटक : इथेच टाका तंबू ) यांची निवड करण्यात आली .

सदर सोहळा नाटय परिषदेच्या सर्व सभासदांस आणि रसिकांना विनामूल्य असून काही जागा राखीव ठेवण्यात येणार आहे .

सर्वोत्कृष्ट व्यावसायिक संगीत नाटक बोलविता धनी ( संस्था : अमरदीप + कल्पकला + सृजन थिएटर्स ), सर्वोत्कृष्ट गायक अभिनेता ओंकार प्रभुघाटे ( संगीत नाटक : गोष्ट संयुक्त मानापमानाची ), सर्वोत्कृष्ट गायक अभिनेत्री संपदा माने ( संगीत नाटक : एकच प्याला ), तसेच नाट्यपरिषद– मुंबई कार्यकर्ता पुरस्कारासाठी विजय सूर्यवंशी, नाट्यपरिषद– शाखा कार्यकर्ता पुरस्कारासाठी विजय शिंगणे, नाशिक शाखा, सर्वोत्कृष्ट एकपात्री पुरस्कारासाठी समीर चौघुले, सर्वोत्कृष्ट निवेदक पुरस्कारासाठी शुभदा फडणवीस, गुणी रंगमंच कामगार मधुकर बाड, नाट्यसमीक्षक पुरस्कारासाठी राजीव जोशी, बालरंगभूमीवरील उल्लेखनीय कार्यासाठी डॉ . सुधा कांकरिया, सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संस्था पुरस्कारासाठी संस्था कलापिनी, तळेगाव दाभाडे, सर्वोत्कृष्ट व्यवस्थापक पुरस्कारासाठी दीपक गोडबोले, रंगभूमी व्यतिरिक्त केलेल्या विधायक कार्यासाठी सुनंदा शेंडगे, सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कारासाठी डॉ . अनिरुद्ध वनकर आणि शाहीर विलास सोनवणे, कामगार रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कारासाठी चंद्रकांत चौधरी यांची निवड करण्यात आली आहे .